सामर्थ्य विसरुन तो शकुंतलेच्या बाबतीत मर्यादेचे उल्लंघन करतो. म्हणजे माणूस विचार आणि विकार यांच्या अंमलाखाली वागत असतो हे नाटककाराने ध्यानात घेतले पाहिजे. त्याने नाटकातील पात्रांचे वर्तन त्यांच्या शीलाशी असंबध्द दाखवू नये त्यामुळे प्रेक्षकांचा विरस होतो. मनुष्यस्वभाव समजण्यास उपजत दृष्टी असावी लागते. विकारांच्या प्रभावाखाली असलेला दुष्यंत यापेक्षा वेगळा वागू शकला नसता असेच श्री. बापट यांना सुचवायचे आहे.

२. मनुष्याचे आयु स्थिर नाही. त्याला गती आहे. त्यामुळे त्याच्या आयु:क्रमातील स्थितीस उगम, मध्य व अंत आहे. या स्थितिपरंपरा मिळून नाटक बनते. नाटकाचे मोठे घटकावयव ह्या मोठ्या स्थिती (Situations) होत. या प्रत्येक स्थितीचे घटकावयव लहान-लहान स्थिती किंवा गोष्टी (Incidents) याचे स्पष्टीकरण करण्यासाठी श्री. बापट यांनी 'शाकुंतल' चे उदाहरण घेतले आहे.

मोठी स्थिती - एक :

ऋषींच्या दर्शनासाठी दुष्यंताचा कण्वाश्रमात प्रवेश, शकुंतला नजरेस पडणे, त्याने कामवश होणे, तिच्या प्राप्तीची इच्छा होणे, ती अप्राप्य असावी असे वाटणे ही पहिल्या स्थितीची उत्पत्ती.

शकुंतला मिळविण्याच्या प्रयत्नास सुरुवात, यशाची आशा हा तिचा मध्य. शकुंतलेची प्राप्ती हा या स्थितीचा शेवट. म्हणजे 'शाकुंतल' चे १ ते ३ अंक ही एक स्थिती.

मोठी स्थिती १ चे घटकावयव :

शकुंतला दृष्टीस पडणे, शकुंतला व तिच्या सख्या यांच्या, तिच्या यौवनावस्थेविषयींच्या संवादास जागा मिळणे, शकुंतलेचा जन्मवृत्तांत व तिला अनुरुप वरास देण्याचा कण्वाचा बेत कळण्याकडे बोलण्याचा ओघ वळणे, शकुंतलेचे मन आपणावर बसले आहे हे दाखविणाऱ्या चेष्टा तिजकडून साहजिक घडणे, सेनापती, सेना व विदूषक यांना दूर करण्याला अवकाश मिळणे, आश्रमात राहण्यास आयती सवड मिळणे, शकुंतला मदनविव्हल झाली असता तिच्या तोंडून कबुली ऐकावयास सापडणे.

मोठी स्थिती - दोन :

तिसऱ्या अंकानंतर दुसरी स्थिती उत्पन्न होते. दुष्यंताचा स्मृतिनाश, शकुंतला तर तू माझे पाणिग्रहण केलेस असे मोठ्ठया निर्धाराने सांगते, दुष्यंत पेचात. पाचव्या अंकाच्या शेवटी ही स्थिती संपते. कण्वास न कळविता इष्ट कार्य साधून घेतले हा अपराध झाला असे वाटू
लागते. जनलज्जेची, दूषणाची भीती वाटू लागते. हा या स्थितीचा शेवट.

मोठी स्थिती दोनचे घटकावयव :

शकुंतला शून्यहृदया असणे, दुर्वासाचा तिच्याकडून अपमान होणे, त्याने शाप देणे, शकुंतलेचे राजगृही येणे, अंगठी हरवणे, स्मृतिनाश, अप्सरसांनी शकुंतलेस उचलून अंतरिक्षात घेऊन जाणे.

मोठी स्थिती - तीन :

दुष्यंताची स्मृती परत येते, विरहदु:खास प्रारंभ पण हळूहळू आशा उत्पन्न होण्यासारख्या गोष्टी घडून येतात. शकुंतलेची प्राप्ती.

मोठी स्थिती तीनचे घटकावयव :

अंगठी सापडणे, स्मृती परत येणे, इंद्राकडून बोलावणे, मारीच ऋषींच्या आश्रमात दुष्यंताने जाणे, शकुंतलेशी गाठ.

श्री. बापट म्हणतात की, या पृथक्करणावरुन खालील गोष्टी दिसतात.

१) स्थितिपरंपरा विलग नसून ती कार्यकारणपरंपरेने जोडली आहे, २) प्रत्येक स्थितीतील घटकावयव काहीतरी दुव्यांनी संलग्न आहेत, ३) हे घटकावयव मुख्य स्थितीला

उगम, मध्य व अंत देऊन त्यातील गती दर्शवीत आहेत, ४) पात्रे व ही सर्व स्थिती यांचा विचार एकमेकांशी पूर्णपणे संलग्न असतो.

कलावंत म्हणजे प्रतिविश्वकर्मा असतो. नाटककार, चित्रकार, शिल्पकार, चितारी, जीवसृष्टीचे नियम पाळून सृष्टीचे अनुकरण करतात. दोन्हीतील साम्य शोधतात त्याचप्रमाणे कल्पनातीत गोष्टींपासूनही मनोरंजकत्व निर्माण करतात.

३. श्री. बापट यांनी अद्‌भुतरसाची मीमांसा केली आहे. नाटकातील अद्‌भुत घटनेपेक्षा त्या घटनेच्या प्रभावाखालील पात्रे कशी वागतात, त्या घटनांचा त्यांच्या मनावर कसा परिणाम होतो आणि त्याद्वारे घडणाऱ्या कृतीतून नाटकाला कशी गती मिळते हे पाहाणे महत्वाचे आहे.

अद्‌भुत घटनांचे वर्गीकरण त्यांनी दोन प्रकारे केले आहे.

१) प्रेक्षकांच्या आकलन सामर्थ्याप्रमाणे
अ)कल्पनेने ग्रहण होणाऱ्या गोष्टी, ब) कल्पनातीत गोष्टी

२) क्रिया करणाऱ्याच्या कोटीप्रमाणे
अ) मानवी, ब) दैविक

नाटकातील अद्‌भुतरसांच्या प्रसंगांची दहा उदाहरणे त्यांनी दिली आहेत त्यात चार उदाहरणे ‘शाकुंतल’ मधील आहेत.

१) कण्वांनी आपल्यामागे आश्रमात काय घडले हे अंतर्ज्ञानाने जाणणे, २) दुर्वासाच्या शापाने स्मृतिनाश होणे, ३) शकुंतलेच्या सख्यांनी दुष्यंताची विरहावस्था अदृश्य राहून पाहणे, ४) शकुंतलेस अप्सरांनी अंतरिक्षात उचलून नेणे

अद्‌भुतरसाचा स्थायीभाव विस्मय हा आहे असे सांगून लेखकाने थोडी वेगळ्या प्रकारची अद्‌भुतरसाची उदाहरणे दिली आहेत त्यात अनसूयेस राजा शकुंतलेस विसरेल का असे काही तादृश कारण नसता वाटणे व पुढे तसेच घडून येणे हे एक उदाहरण आहे. यावर

लेखक म्हणतात की, अनसूयेचे हे वाटणे पाहून विस्मय उत्पन्न होतो.भ्द   १७ एवढाच आहे की, हा परिणाम क्षणिक आहे. दैव अनुकूल नसले म्हणजे उजवे-डावे होते व पुढे येणाऱ्या गोष्टी कधी-कधी आपली छाया अगोदरच पाडतात याचा व्यवहारात आपणास अनुभव येतो त्यामुळे विस्मय उत्पन्न होतो. ''

४. श्री. बापट यांनी(Unity of Time, Unity of Action, Unity of Place) यांचा विचार केला आहे. Unity of Action म्हणजे नेमके काय यासंबंधी असलेले वेगवेगळे विचार सांगून अलींळर्ीिं म्हणजे कृती हे स्वत:चे मत त्यांनी व्यक्त केले आहे. ते म्हणतात, '' नाटकातील१८ कृती म्हणजे नायक-नायिकेच्या कृती व त्यांस आंदोलित करणाऱ्या साधक व रोधक किंवा बाधक इतर पात्रांच्या कृती या सर्व मिळून जी एक कृती बनते ती होय. '' श्री. बापट यांना कृती म्हणजे कृतीसमुच्चय हा अर्थ अभिप्रेत आहे. नाटकाच्या बाबतीत कृती हा शब्द, पात्रे जे-जे काही करतात ते या अर्थाने वापरला जातो. कधी-कधी मूळ कथेतील काही कृती वगळाव्या लागतात. काही कल्पनेने घालाव्या लागतात. 'शाकुंतल' मध्ये पाचव्या अंकापासून सातव्या अंकापर्यंत जो कृतिसमुच्चय आहे. तो कालिदासाने आपल्या कल्पनाशक्तीने बनविलेला आहे.

नाटकातील सर्व कृती एकत्र केल्या म्हणजे त्याची एक संलग्न कृती बनते. दुष्यंताचा आयुवृत्तांत म्हणजे दुष्यंताची शकुंतलेशी भेट, तिच्याशी लग्न, तिची ताटातूट व तिची पुन: भेट. दुष्यंत तिसऱ्या अंकाच्या अखेरपर्यंत जे-जे करतो ते सर्व मिळून त्याची एक कृती बनते. तसेच पाचव्या अंकापासून सातव्या अंकापर्यंत तो जे-जे करतो ती त्याची एक संयुक्त कृती होय.

पहिल्या अंकापासून पाचव्या अंकापर्यंत शकुंतला जे-जे करते ते म्हणजे तिची संयुक्त कृती होय. सातव्या अंकात ती जे-जे करते ती तिची कृती होय. हेच तिच्या सख्यांच्या बाबतीतही म्हणता येईल.

कृतींच्या संदर्भात एक महत्वाचा प्रश्न श्री. बापट यांनी उपस्थित केला आहे आणि त्याचे स्पष्ट उत्तरही दिले आहे. सहाव्या अंकात दुष्यंत जे-जे करतो त्याला कृती कसे म्हणता येईल ? असा प्रश्न पडू शकेल कारण तो मनातला हेतू साध्य करण्याकरता किंवा दाबण्याकरिता काहीच करत नाही. पण तो फक्त शोकाकुल झालेला आहे. शंकेचे उत्तर

लेखकाने असे दिले आहे की, इच्छित हेतू साधण्याकरिता प्रयत्न करणे हे जशी कृती होय तसेच दु:ख सोसणे ही-ही कृतीच होय.

नायक-नायिकांखेरीज इतर पात्रे जे करतात त्यांचाही समावेश कृतींमध्ये केला पाहिजे हे लेखकाने स्पष्ट केले आहे. मुख्य पात्रांच्या कृतींना आंदोलित करण्याचे कार्य इतर पात्रांच्या कृती करीत असतात. दैवी कृतींचाही समावेश यात केला पाहिजे. इतर पात्रांच्या कृती, दैवाच्या कृती मुख्य पात्रांच्या कृतीला अनुकूल असतील किंवा प्रतिकूलही असतील पण त्यांचा अंतर्भाव नाटकाच्या कृती (Action)मध्येच होतो.

याच ठिकाणी (Three Unities) संबंधीच्या पाश्चात्य संकल्पना श्री. बापट यांनी मांडलेल्या आहेत आणि संविधानक रचनेचे Action, Interest, Situation, Unities इ. संज्ञांचे भेद मराठी नाट्यविषयक वाङ्मयात नवीन आहेत परंतु ते समजावून घेणे आवश्यक आहेत असा विचार व्यक्त केला आहे.

५. नाटकातील मध्यबिंदू (Climax) कसा निश्चित करावयाचा या संबंधीचे विवेचन करण्यापूर्वी श्री. बापट यांनी
(Unity of Action) च्या जुन्या अर्थाने अलिकडील पाश्चात्य नाटककार, भारतीय प्राचीन, अर्वाचीन नाटककार नाट्यरचना करीत नाहीत इकडे लक्ष वेधले आहे.

Unity of Action चा अर्थ आपल्याकडे कृतीतील अद्वैत असा मानला जातो. याचा अर्थ पूर्वी Excluding such matter as threatened to set up a second interest in a play असा होता. म्हणजे नाटकात मुख्य मनोवेधक जी कृती असेल तिच्याजवळ दुसरी मनोवेधक कृती ठेवण्याचे टाळणे. अलिकडील संविधानक एकाकी नसून तो संविधानकाचा समुच्चय असतो आणि त्याच्या व्यवस्थित मांडणीमुळे कृतीसमुच्चयाची एकवाक्यता निर्माण होते. या अर्थाने कृतीतील ऐक्य म्हणजे खिंडी बुजविणे होय असा एक सलग नवा विचार श्री. बापट यांनी सविस्तर उदाहरणांनी मांडला आहे.

ज्या संविधानकात एकच कृती असते व दुसरी कृती तिच्या बाजूस ठेवली जात नाही असे नाटक म्हणजे 'शाकुंतल' हे सांगून श्री. बापट यांनी 'शाकुंतल' मध्ये विविध कृती आणि काळ यातील खिंडी कशा बुजविल्या आहेत त्याची सविस्तर चर्चा केली आहे.

संविधानकाला आदि, मध्य व अंत असतात. संविधानकाचा मध्य वेगवेगळ्या प्रकारे ठरविता येतो. संविधानकातील गुंतागुंत सुटायला जिथे प्रारंभ होतो ते ठिकाण म्हणजे मध्य मानणे हा एक विचार. नाटकातील मुख्य रसाचा जिथे कळस होतो ते ठिकाण म्हणजे नाटकाचा कळस असे ठरविता येईल. या दोन्ही मध्यांचा एकच बिंदू करता येईल. ते जर साधले नाही तर रसदृष्ट्या साधलेला मध्य हाच खरा मध्य मानावा असे सांगून श्री. बापट यांनी नाटकाला कमानीची उपमा देऊन नाटकाच्या मध्याचे विवेचन केले आहे. त्यासाठी 'शाकुंतल' चे उदाहरण घेतले आहे. 'शाकुंतल' चा पाचवा अंक हा मध्य आहे असे मत व्यक्त करुन त्यात जाणवलेली एक उणीवही दाखविलेली आहे. दुर्वासाचा शाप काय आहे हे चवथ्या अंकातच कळल्याने पाचव्या अंकातील दुष्यंताच्या मन:क्षोभाचा परिणाम उणावतो. तो शाप कशाच्या संबंधात आहे हे कळले नसते तर हा मध्य चांगला ठरला असता. हा मध्य व गुंतागुंत सुटण्यास सुरुवात होणारा मध्य हे साधारण एकच झाले असते असे प्रतिपादन श्री. बापट यांनी केले आहे.

६. मुख्य पात्राचे शील (Character) व पात्रसंघ (Group of Characters) यासंबंधीचा विचार मांडताना श्री. बापट यांनी प्रथम भगवद्गीतेतील विवेचनाचा आधार घेतला आहे. माणूस, त्याचे वर्तन, त्याच्या हातून घडणाऱ्या कृती, मानवी मनावर प्रभाव पाडणारे घटक इ. बाबत त्यांनी भगवद्गीतेतील वचनांचा आधार घेतला आहे. त्याचप्रमाणे मोल्टनसाहेबांचे, ' Character' संबंधीचे मतही सांगितले आहे.

'' A mans character is the shadow of his past life. It is the grand resultant of all the force from within and from without that have been acting upon him since he became a conscious agent "

मनुष्याच्या शीलाच्या बांधणीचे जर पूर्व, मध्य व उत्तर असे तीन भाग केले तर मध्यभाग नाटकाचा विषय होईल. उत्तरभागाशी नाटकाचा फार क्वचित संबंध येईल पण मध्यभाग हा पूर्वभागाचीच वाढ असल्याने मध्यभाग पूर्वभागाशिवाय समजणारच नाही म्हणून नाटकाच्या काळाच्या कमी-अधिक प्रमाणानुसार पूर्वभाग किती व कसा दाखवावा ते नाटककाराने ठरविले पाहिजे. या सगळ्या विवेचनातील निष्कर्ष श्री. बापट यांनी मांडले आहेत ते असे.

१) मनुष्याचे शीलास वाढ असते. जसे एखादे झाड वाढत जाते त्याप्रमाणे मनुष्यात बीजरुपाने आलेले शील वाढत जाते व सर्व शील म्हणजे ही सर्व वाढ. २) नाटकात या वाढीचा लहानसाच भाग दाखविता येतो. ३)हा लहान भाग त्याच्यापूर्वीचा भाग समजल्याशिवाय समजत नाही. ४)नाटकात जो भाग दाखविला जातो त्या भागात तेवढ्यापुरती वाढ होते. ५) व ही वाढ म्हणजे पूर्वसंचिताने आलेले शील, परिस्थिती व स्वातंत्र्यशक्ती या तिघांचे झगडणे होय.

‘ शाकुंतल नाटक निबंध ’ मध्ये श्री. बापट यांनी दुष्यंत आणि शकुंतला यांच्या शीलाविषयीचे विवेचन केले आहे तो संदर्भ देऊन या पात्रांच्या संदर्भात पुन: विवेचन केले आहे. या ठिकाणी स्वत:चे एक महत्वाचे मत त्यांनी नोंदविलेले आहे. त्यांच्या मते बावनकशी शीलाच्याच नायक - नायिका नाटकात असाव्या, कमी दर्जाच्या नसाव्यात असे मुळीच नाही. ज्या शीलाचे पात्र नाटकात घातले आहे ते शील कसे दाखविले गेले आहे हे महत्वाचे असते.

६. नाटकाचा विचार करताना प्रत्येक पात्राच्या शीलाचा विचार महत्वाचा असतो त्याचप्रमाणे पात्रसंघाचा Group of Characters विचारही महत्वाचा ठरतो. पात्रसंघातील विशिष्ट पात्रांच्या शीलामुळे, वैशिष्ट्यांमुळे नाटकात काही कार्य घडून येत असते. पात्रसंघातील विशिष्ट शीलाची पात्रे काढून जर त्याजागी वेगळ्या प्रकारची पात्रे घातली तर नाटककाराला हवे ते कार्य घडून येणार नाही. ‘ शाकुंतल ’ चा विषय पौराणिक असूनही कालिदासाला अनसूया, प्रियंवदा, दुर्वास, सेनापती, विदूषक, शारङ्गरव, शारद्वत ही पात्रे निर्माण करावी लागली आहेत. दुष्यंत, शकुंतला आणि अनसूया, प्रियंवदा या रजोगुणप्रधान व्यक्तींमध्ये काही अंशाचा फरक आहे. कण्व, शारङ्गरव, दुर्वास या सत्वगुणप्रधान पात्रातही काही अंशाचा फरक आहे. या दोन्ही प्रकारच्या पात्रांचा जो परस्परसंबंध नाटकात येतो त्यामुळे नाटक मनोरंजक बनते. म्हणजे मुख्य पात्रे आणि त्यांच्या आजुबाजूला वावरणारी इतर पात्रे यांच्या परस्परसंबंधातून नाट्य आकाराला येते असे श्री. बापट स्पष्टपणे सांगत आहेत.